दि. ०१ ऑक्टोबर २०१९ ते दि. १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणा-या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका
**प्रभाग रचना व आरक्षण सुधारीत कार्यक्रम**

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**
**ई-मेलद्वारे**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०१९/प्र.क्र.०६/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५ जुलै, २०१९

प्रति,
जिल्हाधिकारी *(सर्व),*
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय :-** दि. ०१ ऑक्टोबर २०१९ ते दि. १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मध्ये मुदत संपणा-या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका - प्रभाग रचना व आरक्षण सुधारीत कार्यक्रम

संदर्भ :- (i) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २८/०५/२०१९ चे प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम आदेश.
(ii)राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात दिनांक २५/०७/२०१९ रोजी VC व्दारे झालेली बैठक
(iii) मा.सर्वोच्च न्यायालयाने SLP NO.33904-33910/2017 मध्ये दिनांक १९ जुलै,२०१९ रोजी दिलेला निर्णय.

महोदय

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक २८/०५/२०१९ च्या आदेशान्वये राज्यातील माहे ऑक्टोबर २०१९ ते जून २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे १७३० ग्रामपंचायतींसाठी प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम देण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांवर दिनांक २९/०७/२०१९ पर्यंत उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन जिल्हाधिकारी यांच्याकडे अभिप्रायासह अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे. जिल्हाधिकारी यांनी दिनांक ०२/०८/२०१९ पर्यंत अंतिम मान्यता द्यावयाची असून या मान्य झालेल्या अंतिम प्रभाग रचनेला दिनांक ०५/०८/२०१९ पर्यंत व्यापक प्रसिध्दी देण्यात येणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्यांची मुदत संपणाच्या पूर्वी घेणे आवश्यक असल्याने पावसाळी कालावधी, दिनांक १९/०७/२०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय, आगामी काळातील सणवार व विधानसभा निवडणुका विचारात घेता, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १०-अ (४) नुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करुन उपरोक्त कालावधी पैकी **दिनांक १ ऑक्टोबर २०१९ ते दि. १३ डिसेंबर २०१९ पर्यंत मुदत संपणाऱ्या सुमारे ४८ तसेच नव्याने स्थापित सुमारे १७ ग्रामपंचायतींच्या खालील टप्प्यांसाठी प्रभाग रचना व आरक्षणाचा सुधारीत कार्यक्रम देण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | i) प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे. | शुक्रवार दि.२६/०७/२०१८ पर्यंत |
| | ii) आलेल्या प्रत्येक हरकती व सूचनांवर सुनावणीनंतर अभिप्रायसह अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे . | |
| २. | i) उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून जिल्हाधिकारी यांनी प्रभाग रचना व आरक्षणाला अंतिम मान्यता देणे व स्वाक्षरी करणे | शनिवार दि.२७/०७/२०१८ पर्यंत |
| | ii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला ( नमुना अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देणे | शनिवार दि.२७/०७/२०१८ पर्यंत |

सबब उपरोक्त कार्यक्रमानुसार दिनांक २७/०७/२०१९ पर्यंत अंतिम प्रभाग रचनेला ( नमुना अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी. तसेच दिनांक २८/०५/२०१९ रोजीच्या प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमतील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द झाल्यानंतर जिल्हानिहाय ग्रामपंचायतींचा आरक्षणचा तपशिल दर्शविणारा नमुना - १ राज्य निवडणूक आयोगास ई-मेलव्दारे पुढील ३ दिवसात सादर करण्याची दक्षता घ्यावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

( किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.
२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी
३. विभागीय आयुक्त ( सर्व )
४. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हापरिषद ( सर्व )
५. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजना केंद्र ( MRSAC ) नागपूर
६. निवड नस्ती